# ही खंत जाळते मना...

रात्र ढळून दोन प्रहर उलटले होते. अण्णा दचकून जागे झाले. कुणीतरी त्यांना अलगद आपल्या कवेत घेतल्यासारखे वाटले. ते थंडगार हात... ती मिठी त्यांच्या पत्नीची असल्याचं त्यांना जाणवलं. ती तर आता हॉस्पिटलमध्ये आहे आणि मग आता... आता ती माझ्या जवळ कशी आली? तिचा स्पर्श अगदी नेहमीचा वाटला.

हा भास की आभास?

अण्णा उठले. दिवा लावला. घड्याळात साडेतीन वाजले होते. त्यांना झोप येणे शक्य नव्हते. तसेच ते बाथरूममध्ये गेले आणि गार पाण्याचा तोंडावर हबका मारून, चूळ भरून परत बेडरूममध्ये आले. घड्याळांत फक्त पावणेचार वाजले होते.

जिना उतरून ते खाली किचनमध्ये आले. दिवा लावून त्यांनी पाण्याची इलेक्ट्रिकची किटली चालू केली. कपाटांतून मग काढून त्यांत कॉफी टाकली व त्यावर किटलीमधून उकळते गरम पाणी ओतले. ती गरमागरम कोरी कॉफी पीत पीत ते मागच्या खिडकीशी आले. अद्याप उजाडायला बराच अवकाश होता. त्यांना वाटलं, रात्र ओली होती. भिजलेल्या टॉवेलसारखी. खिडकीतून क्षीण झालेला चंद्र दिसला. क्षयी माणसासारखा... का कॅन्सर झालेल्या रोग्यासारखा? अण्णा एकदम दचकले. शेजारच्या बंगलीतलं कुत्रं रडत होतं. अण्णांनी आंवढा गिळला आणि मागे वळले.

कुणीतरी मागे उभे आहे का? शंका येऊन ते जिन्याशी आले. जिन्यातून कुणीतरी वर गेल्याचा त्यांना भास झाला. ते जिन्याने वर आले. बेडरूममध्ये डोकावले. कुणी नव्हते... अगदी कुणी नव्हते! कुणी असणे शक्यच नव्हते. एकटेच होते ते. काकी तर हॉस्पिटलमध्ये होती... शेवटचे क्षण मोजत. आठ दिवसांपूर्वीच तिला हॉस्पिक म्हणून वेगळ्या वॉर्डमध्ये हालवली होती. काही उपाय होणारे नव्हते. वाट पाहायची मरणाची... शेवटच्या घटकेची....

Terminally ill!

युरिनसाठी ट्यूब घातली होती. कालपर्यंत तिची युरिन नेहमीसारखी येत होती. सगळ्या डॉक्टर्सना आश्चर्य वाटायचे, की या रोग्याला गेले दहा दिवस ना पाणी ना औषध! मग ही लघवी येते कशी नेहमीसारखी!

विचारात फेऱ्या मारतामारता केव्हा सहा वाजले ते कळल नाही. अण्णांचा मुलगा उठला. त्याने कॉफी ठेवल्याचा आवाज झाला. अण्णा कपडे करून खाली आले. मुलाला आश्चर्य वाटले.

'अण्णा, कुठे निघालात.. एवढ्या सकाळी?'

'अभय... अरे, मला गेलं पाहिजे...हॉस्पिटलमध्ये...'

'इतक्या सकाळी? अण्णा, आता तर हायवे गर्दीनं चिक्कार भरलेला असणार.. पोहचायला एक तास लागेल.'

'लागू दे. मी मागच्या रस्त्यानं जाईन. मला गेलं पाहिजे रे, अभय!!'

'पण अण्णा, थोडं उजाडू द्या. मी येतो तुमच्याबरोबर...'

'नको. मला एकट्यालाच गेलं पाहिजे. तुझी आई मला बोलवतेय.'

अभयने चमकून अण्णांकडे पाहिले.

तो समजला.

'बरं. जपून जा अण्णा. गाडी चालवताना लक्ष ठेवा.'

नोव्हेंबरचा महिना. कडाक्याची थंडी. हातपाय गारठून जायचे असल्या थंडीत.

अण्णांनी गॅरेजमधून गाडी बाहेर काढली. अद्याप उजाडले नव्हते. अंधाराचा धुवट पडदा पसरला होता.

सबडिव्हिजनमधून गाडी हायवेला लागली. हायवे चिक्कार भरला होता. मुंगीच्या गतीने गाड्या पुढे जात होत्या.

अण्णा हॉस्पिटलला पोहोचले. आठ वाजले होते. तीच ती २२०-बची खोली. शेजारच्या खुर्चीत उन्मेष.. त्यांचा नातजावई बसला होता. अण्णांनी त्याला काकीबद्दल विचारले.

'अण्णा, काल रात्रीपासून युरिन बंद झाली आहे. आणि ब्लड प्रेशरपण कमीकमी होतंय..'

'अस्सं..'

'अण्णा, लक्षणं काही ठीक नाहीत.' त्याने सुस्कारा सोडला.

'हॉस्पिक नर्सचं काय मत आहे?'

'ती म्हणते सर्व कारभार लवकरच आटपेल अशी चिन्हं आहेत.'

असं बोलून उन्मेष गप्प झाला.

'बरं.. तू आता घरी जा. मी बसतो काकीजवळ आता. रात्रभर तुला जाग्रण झालंय...'

उन्मेष उठला आणि खाली मान घालून खोलीबाहेर गेला.

अण्णा काकीजवळ खुर्ची घेऊन बसले. त्यांनी तिच्या चेहऱ्याकडे पाहिले. डोळे मिटून शांत झोपल्यासारखा तिचा चेहरा दिसत होता. जणू गाढ निद्रा लागली होती.

काळनिद्रा. अण्णांनी तिचा हात हातात घेतला. त्यांना भडभडून आलं. त्यांनी आपले डोके तिच्या तळहातावर टेकवलं. स्फुंदून स्फुंदून त्यांना उमाळे येऊ लागले.

ते तिच्याशी बोलत होते. हळूहळू बोलत होते. कळवळून बोलत होते. पश्चात्तापाने बोलत होते.

पन्नास वर्षांपूर्वी सुमित्रा त्यांच्या आयुष्यात आली. वय लहान आणि अपुरे शिक्षण. मुंबईत रेडिओ स्टेशनला त्यांची प्रथम भेट झाली आणि त्यानंतर दोघांची मने जुळली. मध्यमवर्गातील दोन्ही कुटुंबे. समंजस आणि व्यवहारी. अण्णांच्या घरच्यांनी लग्नाला संमती दिली. अण्णांनी संसार थाटला. लहानशा खोलीत मुंबईत. सरकारी खात्यांत कारकुनाची नोकरी आणि सकाळचे कॉलेज. दोन वर्षात बी.ए. उत्तीर्ण करून अण्णांनी वकिलीच्या टर्म्स भरल्या. रात्रंदिवस अभ्यास करून अण्णांनी मुंबई हायकोर्टाची सनद मिळवली आणि मुंबईत वकिली सुरू केली. नशीबाने हात दिला. अण्णांची प्रॅक्टिस चांगली चालली. सुमित्रा दोन मुलांची आई झाली. काटकसर आणि हिशोबीपणा ठेवून चांगला संसार केला तिनं.

फक्त एकच दुःख तिला नेहमी टोचत होतं. अण्णा कॉलेजमध्ये तिसऱ्या वर्गात असताना त्यांना सिगारेटचे व्यसन लागलं होतं. रात्ररात्र बसून अभ्यास करताना त्यांना सिगरेट आणि चहा लागायचा. कायद्याची मोठमोठी पुस्तके वाचताना त्यांना सिगारेटशिवाय सुचायचं नाही. सुमित्राने हरतऱ्हेने सांगून पाहिले. प्रेमाने.. रागाने.. अगदी त्राग्यानेसुद्धा! पण काही उपयोग झाला नाही. अण्णा सिगारेट ओढत राहिले. जवळजवळ चाळीस वर्षे अण्णा सिगरेट ओढत होते. अण्णांचं व्यसन काही सुटलं नाही.

चाळिशी उलटल्यानंतर अण्णा अमेरिकेला आले. एका मोठ्या कंपनीत

कायद्याचे सल्लागार म्हणून त्यांना चांगली नोकरी मिळाली. मुलांची चांगली शिक्षणे झाली. दोन्ही मुलांची भारतात जाऊन लग्ने करून दिली. त्यांचे संसार सुरू झाले. काळ पुढे धावत होता. अण्णा निवृत्त झाले आणि टेनसीमधील एका सुंदर गावी स्थाईक झाले. आता मात्र त्यांना सिगरेट आवडेनाशी झाली आणि एक दिवशी निग्रहाने अण्णांनी सिगरेट ओढणे बंद केले.

अण्णांचे व्यसन संपुष्टात आले.

आज अण्णांच्या समोर तो सगळा भूतकाळ एखाद्या भेसूर श्वापदासारखा उभा ठाकला होता. सुमित्रेचा हात हातात घेऊन ते बोलत होते. क्षमा मागत होते. तिच्याकडे दयेची भीक मागत होते. पश्चात्तापाने त्यांचे अंतःकरण उन्मळून आले होते.

चाळीस वर्षे ती अण्णांनी सोडलेला सिगरेटचा धूर सहन करीत होती. गाडीत बसल्यावर आणि घरात शिरल्यावर अण्णांचे धूम्रपान चालू असायचे. एकदा तर तिने चिडून सिगरेटच्या थोटकांना उकळून त्याचा चहा अण्णांच्या समोर ठेवला होता. त्या आठवणीने अण्णांना पुन्हा भडभडून आले.

अण्णा याचना करीत होते. भीक मागत होते. क्षमेची!!

दहा दिवसांपूर्वीच सुमित्रेचा घरात तोल जाऊ लागला. गरगरल्यासारखं वाटायला लागले. आल्याआल्या तिच्या मेंदूचा MRI काढला गेला. खोलीत गेल्यावर बोन मॅरो काढून तपासणीसाठी नेला. आणखीन काही रक्त, तपासणीसाठी काढले गेले. तिला झोपेचे औषध दिले. दुसरा दिवस असाच डॉक्टरांच्या विचारविनिमयात गेला. तिसऱ्या दिवशी तिची वाचा बंद झाली. ताबडतोब तिला थॉयिरॉइड टेस्टसाठी चिकित्सालयात नेले. टेस्ट अनिर्णित होती. निरनिराळ्या क्षेत्रांतले निष्णात डॉक्टर्स गंभीरपणे चर्चा करीत होते. रोगाचे निदान होत नव्हते. चौथा दिवस उजाडला. सुमित्रा झोपेत होती. तिला मुद्दाम जागी करावी लागली. तिने डोळे उघडण्याचा प्रयत्न केला. पण दृष्टी स्थिर होईना. तिला माणसे ओळखू येईनात. फक्त कानाने ऐकू येत असावे. कारण आवाजाच्या दिशेने ती तोंड फिरवायची. मानेने हो-नाही सांगायची.

मोठ्या डॉक्टरांनी पुन्हा एकदा सर्व डॉक्टरांची मिटिंग बोलावली आणि सर्वानुमते कॅन्सर विशारद (Oncologist) ला बोलवायचे ठरवले. त्यावेळी डॉ. हेलन बॅलबॅस्ट्रो ही कॅन्सरतज्ञ म्हणून ड्यूटीवर होती. तिने आल्या आल्या सर्व रिपोर्टस; X-Rays आणि MRI मागविले. पेशंटला कॅन्सर असल्याची तिला शंका आली. सुमित्राच्या पहिल्या MRI रिपोर्टवरून तिच्या मेंदूवर छरे

(lesions) असल्याच्या स्पष्ट खुणा दिसत होत्या. तिने लगेच तिचा छातीचा सी.टी. स्कॅन काढायला सांगितला.

सी.टी. स्कॅन पाहिल्यावर तिची शंका बळावत चालली. कारण जसे छऽऽरे मेंदूवर होते, तसेच छऽऽरे फुफ्फुसावर होते. शेवटी अगदी शंभर टक्के खात्री करवून घेण्यासाठी तिनं डॉ. मिगुल गोमेझ यांना पुढचे प्रोसिजर करायला सांगितले. या टेस्टमध्ये पेशंटच्या गळ्याखाली भोक पाडून, छोटासा कॅमेरा लावलेली एक ट्युब, दोन फुफ्फुसांच्यामध्ये घालतात आणि मग हा इवलासा फिरता कॅमेरा, पेशन्टच्या फुफ्फुसाचे फोटो घेत राहतो. डॉक्टर हे फोटो बाहेरच्या मॉनिटरवर लक्षपूर्वक पाहात असतो व त्याची फिल्म टेप केली जाते. हे सर्व व्हायला जवळजवळ चार तास लागले. अण्णा आणि त्यांची मोठी मुलगी वसुधा बाहेर बसून राहिली होती. डॉ. मिगुल गोमेझ ऑपरेशन थिएटरच्या बाहेर आल्यावर त्यांनी अण्णांना जवळ बोलावलं आणि म्हणाले,

'Mr. Deshpande, I am sorry, Your wife has cancer.....definitely she has cancer and it has spread allover. We can do very little to save her life.'

'But how come Doctor Gomez, this cancer was not detected earlier? We use to have her medical check up every year and blood tests too.'

'Sir, this type of cancer is called "Adenocarcinoma' a type of Lung cancer which usually occurs in non-smoking women above the age of sixty... or sixty five..."

"Doctor, my wife was a non-smoker.. How come she got this cancer?"

"The primary cause for this type of cancer is Secondhand Somke. Was any one in your family, a regular smoker in the house?'

"Yaa.. I use to smoke regularly in the house. I picked up the habit in my college. Doctor, I tried to quit many.. many times."

"Well that explains...!Secondhand smoke is a major contributing factor for this..."

डॉक्टर गोमेझ निघून गेले. अण्णांनी डोक्याला हात लावला आणि मटकन खाली बसले. घेरी आल्यासारखे त्यांना झाले. सारे हॉस्पिटल भोवती फिरतेय असे त्यांना वाटले.

आठवड्याभरात सुमित्रा गेली. अमेरिकेतल्या कायद्याप्रमाणे ४८ तास तिचा मृतदेह शीतगृहात ठेवला गेला. त्यानंतर रीतसर तिचे क्रिमेशन झाले. तिची आठवण येऊन अण्णा सैरभैर झाले. ते अधिक वाकले, अधिक म्हातारे झाले. शरीराने आणि मनानेसुद्धा!!

.. माझ्यामुळे.... माझ्या व्यसनामुळे सुमित्रा गेली. मी मारली तिला. आज या उतारवयात माझी सहचरी गेली. मी एकटा झालो.. मी एकटा झालो..!!!

अण्णांना रात्रंदिवस ही खंत जाळीत राहिली.

■

**– दिवाकर कारखानीस**

**('मन वढाय वढाय' या पुस्तकातून)**